MHKO100006502022

**नियमीत दिवाणी दावा क्र. १६९/२०२२**

शोभा चंद्रकांत कल्लोळी वगैरे.
//वि//
सुनिलदत्त बाबूराव कल्लोळी वगैरे.

**निशाणी क्र.१२ वर आदेश**

वादी यांनी प्रस्तुतचा अर्ज दिवाणी प्रक्रिया संहिता आदेशीका ६, नियम १७ अन्वये दावा दुरुस्तीसाठी दाखल केलेला आहे.

०२. वादी यांनी अर्जात असे कथन केले आहे की, वादी यांनी प्रस्तुतचा दावा प्रतिवादी यांचेविरुद्ध दावा गैरहक्काने मालकी हक्क जाहीर होऊन मिळणेकरीता व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. तरी दावेचे परिच्छेद क्र.६ चे शेवटचे ओळीमध्ये शेवटी 'आहे' या अक्षराला काट मारुन दावा दुरुस्त करणेस परवानगी मिळणेसाठी दाखल केला आहे. सदर बाब ही टंकलिखीत चुकीमुळे नजरचुकीने झालेली आहे. वादी यांनी दावा दुरुस्त केलेस प्रतिवादी यांचे कोणतेही नुकसान होणार नाही. उलट, तसे न झाल्या वादी यांचे अतोनात नुकसान होणार आहे. सबब, वादी यांनी अर्ज मंजुर करण्याची विनंती केली.

०३. प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्जास निशाणी क्र.१४ येथे हरकत नोंदविली व असे कथन केले की, वादी यांचा सदरचा अर्ज खोटा व लबाडीचा असुन तो प्रतिवादी यांना मान्य व कबूल नाही. वादी यांनी प्रतिवादी यांचेविरुध्द दि.२०.०६.२०२२ रोजी सदरचा दावा दाखल केला आहे. दावा दाखल करतेवेळी वादी व वादीचे वकीलांनी टंकलिखीत दाव्याचे वाचन करुन, ते समजावून घेऊन त्यानंरत सदरचा दावा मे. न्यायालयात दाखल केला आहे. त्यावेळी वादी यांनी मे. अधिक्षकसोा यांचेसमोर ॲफीडेव्हीट वाचून व समजावून घेऊन पुर्ण केले आहे. त्यावेळी वादी यांना त्याबाबतची पूर्ण कल्पना होती. वादीने दावेत मागणी केलेली दुरुस्ती ही दावा दुरुस्ती करणेच्या तत्वांच्या तरतुदीनुसार नाही. सदर कलम ६ मध्ये केलेली कथने व दावा दुरुस्ती अर्जात काट मारणेबाबत नमुद केलेला शब्द हा अनावधानाने व टंकलेखकाच्या नजरचुकीने झालेला नाही. उलट, वादीने दावेतील कलम ६ मध्ये केलेली कथने ही दाव्यात मान्य केलेले तथ्ये हया स्वरुपाची आहेत. त्यामुळे त्यांना आता दावा दुरुस्ती अर्जात मागणी

केलेप्रमाणे मान्य केलेल्या बाबी कमी करुन मागता येणार नाहीत. वादींनी सुचविलेली दुरुस्ती मंजुर झाल्यास प्रतिवादी यांचे हक्कास बाधा निर्माण होणार आहे. सदर अर्ज नामंजुर केल्यास वादींचे काहीही नुकसान होणार नाही. सबब, प्रतिवादी यांनी प्रस्तुत अर्ज खर्चासह नामंजुर करण्याची विनंती.

०४. प्रकरणाचे अवलोकन केले. दोन्ही पक्षांचा युक्तीवाद ऐकला. प्रस्तुतचा दावा वादी यांनी दावा गैरहक्काने मालकी हक्क जाहीर होऊन मिळणेकरीता व कायम मनाईसाठी दाखल केलेला आहे. वादींचे असे कथन आहे की, दावेचे परिच्छेद क्र.६ चे शेवटचे ओळीमध्ये शेवटी 'आहे' या अक्षराला काट मारुन दावा दुरुस्त करणेस परवानगी मिळावी सदर बाब ही टंकलिखीत चुकीमुळे नजरचुकीने झालेली आहे. प्रस्तुत प्रकरणाचे व अर्जाचे अवलोकन केले असता असे दिसून येते की, वादीने संपुर्ण दाव्यामध्ये वारंवार दावा मिळकत ही वादी यांचे कब्जेवहिवाटीत होती व आहे असे कथन केले असुन वारंवार दावा मिळकतीशी प्रतिवादींचा कोणताही संबंध नसल्याचे कथने केलेली आहेत. तसेच, दाव्याचे परिच्छेद क्र.६ चे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, त्यामधील मजकुर वादीने दावा मिळकतीसंदर्भात त्यांचे कुटूंबातील पुर्वीच्या बाबीसंदर्भात नमुद केले असुन परिच्छेद क्र.७ मध्ये देखील पुर्वीच्या बाबी नमुद केल्या आहेत. त्यामुळे, सदर परिच्छेद क्र.६ च्या शेवटी लिहिलेले शब्द "आहे" हे वादीचे कथनाप्रमाणे नजरचुकीने टंकलिखीत चुकीने लिहिले असल्याचे दिसुन येते.

०५. याशिवाय, प्रतिवादींची कैफियत नि.१८ चे अवलोकन केले असता त्यामध्ये देखील प्रतिवादींनी परिच्छेद क्र.७ मध्ये असे नमुद केले आहे की, दाव्यातील परिच्छेद क्र.६ मधील सदर वादांकीत मजकुर नाकारलेला आहे. त्यामुळे, सदर शब्द "आहे" हे टंकलिखीत चुकीमुळे झालेले असल्याचे दिसुन येते.

०६. याव्यतिरिक्त, वादीने त्याचे दाव्यामध्ये केलेले कथन हे सबळ पुरव्यानिशी शाबीत करण्याची जबाबदारी वादीवर असते. केवळ दुरुस्ती अर्जानुसार दाव्यात काही बाब दुरुस्त केल्यास ती शाबीत झाली असे ठरत नाही. त्यामुळे, वादीने मागणी केल्याप्रमाणे दुरुस्ती केलेली बाब ही वादीने सबळ पुराव्यानिशी शाबीत करणेची जबाबदारी वादीची आहे.

०७. प्रतिवादीचे वकीलांनी युक्तीवाद केला की, वादीने दाव्यामध्ये मान्य केलेले कथन हे दुरुस्ती अर्जाने कमी करता येत नाही. त्याकरीता प्रतिवादीचे वकीलांनी मा. सर्वोच्च न्यायालयाचे Modi Spinning and Weaving Mills Co. Ltd. Vs. Lodha Ram & Company, LAWS (SC) 1976 9 18 या न्यायनिर्णयाचा आधार घेतला आहे. त्यासंदर्भात वादीचे एकुण दाव्यातील कथन पाहता वादीने प्रतिवादीचे दावा मिळकतीत कब्जेवहिवाट असल्याचे नाकारलेलेच आहे. केवळ परिच्छेद क्र.६ मध्ये सर्वांत शेवटी एक शब्द "आहे" असे नमुद केलेले आहे. सदर बाब वादीने नजरचुकीने व टंकलिखीत चुकीमुळे झालेली असल्याचे कथन केलेले आहे. त्यामुळे, दाव्यातील एकूण कथन पाहता वादीने वारंवार दावा मिळकतीत प्रतिवादी यांचा ताबा नसल्याचे कथन केलेले असल्याने आणि परिच्छेद क्र.६ मध्ये त्यांचे परिवारातील पार्श्वभूमी व पूर्वीच्या बाबी नमुद करताना प्रतिवादी यांचा ताबा होता व आहे असे नजरचुकीने व टंकलिखीत चुकीने झालेली असल्याचे दिसुन येते. तसेच, प्रतिवादींनी त्यांचे कैफियतीमध्ये त्याबाबत कोणताही स्पष्ट उल्लेख केलेला नसल्याने वादी प्रस्तुत दुरुस्ती अर्जाने दाव्यात मान्य केलेली बाब कमी करीत आहेत असे म्हणता येणार नाही.

०८. शिवाय, प्रतिवादी तर्फे दाखल मा. सर्वोच्च न्यायालयाचे न्यायनिर्णयाचे अवलोकन केले असता त्यामध्ये सदर दाव्यातील प्रतिवादी यांनी त्यांच्या कैफियतीमधील दोन मुळ परिच्छेद कमी करुन नवीन दोन परिच्छेद दुरुस्तीने दाखल करु पाहत असल्याने न्यायालयाने सदर दुरुस्त परिच्छेद हे मान्य केलेल्या बाबी कमी करुन नवीन तथ्ये अभिलेखावर आणत असल्याने सदर दुरुस्तीचा अर्ज नामंजुर केला होता. सदर दुरुस्तीचा अर्ज नामंजुर केल्याचे आदेशास मा. सर्वोच्च न्यायालयाने बरोबर ठरवुन प्रतिवादी त्यांचे कथनामध्ये परस्पराविरोधी कथने करु शकत नसल्याचे निरीक्षण केले आहे. सदर न्यायनिर्णयातील निरीक्षण व प्रस्तुत प्रकरणातील परिस्थीती पाहता प्रस्तुत अर्जानुसार वादी हे केवळ टंकलिखीत चुकीने लिहिलेला केवळ एक शब्द कमी करु पाहत आहेत. शिवाय, वादीच्या एकूण दाव्यातील कथनानुसार सदर शब्द हा टंकलिखीत चुकीने झालेला असल्याचे दिसुन येत असल्याने प्रतिवादीतर्फे दाखल न्यायनिर्णयातील निरीक्षण प्रस्तुत दाव्यातील परिस्थितीस लागू होत नाही.

०९. प्रस्तुतचा दावा हा प्राथमीक स्थितीत आहे. दाव्याची चौकशी अद्याप सुरु

झालेली नाही, त्यामुळे आदेश ६, नियम १७ च्या निर्बंधाची बाधा प्रस्तावित दुरुस्तीस येत नाही. सदरची दुरुस्ती दाव्याच्या प्राथमीक स्थितीमध्ये मागितलेली असल्यामुळे ती मंजुर केल्यास प्रतिवादींचे कोणतेही नुकसान होणार नाही. त्याऊलट, दाव्याचा गुण-दोषावर न्यायनिर्णय करण्यासाठी मदतच होणार आहे. सबब, प्रस्तावित दुरुस्ती मंजूर केल्यास दाव्याच्या स्वरुपात कोणताही बदल होणार नाही. त्यामुळे, मी खालीलप्रमाणे आदेश पारीत करत आहे.

**-: <u>आदेश</u> :-**

०१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

०२. वादी यांनी अर्जात सुचविलेली दुरुस्ती १४ दिवसांच्या आत दाव्यामध्ये करुन त्याअनुषंगाने दुरुस्त दाव्याच्या प्रती न्यायालयात सादर कराव्यात.

DISTRICT COURTS MAHARASHTRA

Digitally signed by SUJIT AMBADAS RATHOD
Date: 2022.10.12 17:56:43 +0530

**( एस. ए. राठोड )**
२रे सह दिवाणी न्यायाधीश, क.स्तर,
गडहिंग्लज.

गडहिंग्लज.
दिनांकः १२/१०/२०२२.

Order are same, word to word, as per the original Judgment/Order.

| | |
|---|---|
| Name of stenographer | R. D. Patil. |
| Name of Court | S. A. Rathod,<br>2nd Jt. Civil Judge Jr. Dvn. and Judicial Magistrate First Class, Gadhinglaj. |
| Date of Dictation | 12/10/2022 |
| Order signed by P.O. on | 12/10/2022 |
| Order uploaded on | 12/10/2022 |